<u>निवडसूची वर्ष २०१९-२०२०</u>
**उप जिल्हाधिकारी (निवड श्रेणी) या संवर्गातील अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी या संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत.**
**श्री. प्रशांत रावसाहेब शेळके**

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन आदेश क्र.पदोन्नती-२०२३/प्र.क्र. २३५/आस्था-०१ (ई ऑफीस क्र. १३७४३०७)**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : १३ एप्रिल, २०२६

**संदर्भ :-** १) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र.एसएनटी-२०१४/प्र.क्र.०४/ई-१अ, दि. ०३.०३.२०१८
२) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआकरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/ कार्या.१२, दि. १४.०७.२०२१
३) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. ईएसबी ११२०/प्र.क्र. ०८/१३, दि. २७.१०.२०२०.

**शासन आदेश :-**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. ३ येथील दि. २७.१०.२०२० च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या आस्थापना मंडळ क्र. २ च्या शिफारशींच्या अनुषंगाने निवडसूची वर्ष २०१९-२० मधून उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) (गट-अ) (वेतनश्रेणी एस-२३ ₹६७,७००-२,०८,७००/-) या संवर्गातील अधिका-यांना अपर जिल्हाधिकारी (गट अ) (वेतनश्रेणी एस-२५ ₹७८,८००-२,०९,२००/-) या संवर्गात सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने तात्पुरत्या पदोन्नती देण्यात आल्या आहेत.

२. निवडसूची वर्ष २०१९-२०२० मध्ये अपर जिल्हाधिकारी या पदावर निव्वळ तात्पुरती पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापना मंडळ क्र. २ समोर सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावामध्ये श्री. प्रशांत शेळके, उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) यांच्या नावाचा समावेश करण्यात आला आहे. सदर आस्थापना मंडळाच्या बैठकीच्या दिनांक २७.१०.२०२० रोजीच्या इतिवृत्तामध्ये अनु. ६ येथे विभागीय चौकशीच्या किंवा न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्याच्या कारणास्तव आस्थापना मंडळाच्या निर्णय मोहोरबंद पाकीटात ठेवण्यात आलेल्यांमध्ये श्री. प्रशांत शेळके यांचे प्रकरण मोहोरबंद पाकीटात ठेवण्यात आले होते.

३. श्री. प्रशांत शेळके यांचेविरुध्द शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक २५.०९.२०२० अन्वये, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये सुरु करण्यात आलेल्या संयुक्त विभागीय चौकशी प्रकरणी, शासन आदेश, महसूल व वन विभाग, दिनांक १८.०७.२०२३ अन्वये "श्री. प्रशांत शेळके, तत्का. उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), पुणे यांचेविरुध्द शासन आदेश व ज्ञापन क्र. विभाचौ-२२१६/४७१/प्र.क्र. ९५/ई-४, दिनांक २५.०९.२०२० अन्वये सुरु करण्यात आलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी अंशत: सिध्द होणा-या दोषारोपांचे स्वरुप पाहता, श्री. प्रशांत शेळके, तत्का. उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), पुणे यांना " ठपका" ठेवण्याची शिक्षा बजावण्यात आली आहे.

४. प्रस्तुत प्रकरणी श्री. प्रशांत शेळके यांना दिनांक १८.०७.२०२३ च्या आदेशान्वये बजावण्यात आलेली शिक्षा, आस्थापना मंडळ क्र. २ च्या दिनांक २७.१०.२०२० मध्ये नमूद वस्तुस्थिती व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १५.१२.२०१७ मधील तरतुद विचारात घेता, श्री. प्रशांत शेळके, उप जिल्हाधिकारी यांचे मोहोरबंद पाकीट उघडण्यात आले असता, श्री. शेळके हे पदोन्नतीसाठी " पात्र" असा शेरा नमूद करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने, श्री. प्रशांत शेळके यांचे निवडसूची वर्ष २०१९-२०२० मध्ये स्थान निश्चित करुन देण्याची विनंती सामान्य प्रशासन विभागास करण्यात आली होती. त्यास अनुसरुन सामान्य प्रशासन विभागाने श्री. शेळके यांचे अपर जिल्हाधिकारी संवर्गातील ज्येष्ठता श्री. अजय मोरे-इमाव- ज्येष्ठता क्र.३२७ यांच्या नंतर व श्रीमती फरोग मुकादम-खुला- ज्येष्ठता क्र. ३३० यांच्या आधी निश्चित करुन दिले आहे.

५. यास्तव, संदर्भाधीन पत्र क्रमांक ३ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २७.१०.२०२० रोजीच्या पत्रान्वये, प्राप्त आस्थापना मंडळ क्र. २ च्या शिफारशीच्या अनुषंगाने उपजिल्हाधिकारी (निवडश्रेणी) (गट-अ) (वेतनश्रेणी एस-२३₹ ६७,७००-२,०८,७००) या संवर्गातील श्री. प्रशांत रावसाहेब शेळके यांना अपर जिल्हाधिकारी (गट-अ ) (वेतनश्रेणी एस-२५ ₹ ७८,८००-२,०९,२००) या संवर्गात सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे, अपर जिल्हाधिकारी पदावर पदोन्नतीनंतर त्यांची खालीलप्रमाणे प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | ज्येष्ठता क्र. | प्रवर्ग | पदोन्नतीनंतर पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | **श्री. प्रशांत रावसाहेब शेळके** | **१२/१९९८** | **खुला** | **अपर जिल्हाधिकारी तथा प्रशासक, नवनगरे शक्तीपीठ महामार्ग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर** |

६. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि. १४.०७.२०२१ च्या अधिसूचनेमधील नियम क्र.२ (२) (ग) नुसार, अतिरिक्त जिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गास विभागीय संवर्ग वाटप नियम, २०२१ हे लागू होणार नाहीत.

७. सदरील आदेश तात्काळ अंमलात येत असून उपरोक्त पदोन्नत अधिकाऱ्याने प्रतिनियुक्तीने पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रूजू व्हावे. सदर प्रतिनियुक्तीने नियुक्तीस सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १७.१२.२०१६ व दिनांक १६.०२.२०१८ मधील अटी व शर्ती लागु राहतील.

८. अपर जिल्हाधिकारी संवर्गातील उक्त अधिकारी यांना खालील अटी/शर्तींच्या अधीन राहून पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहेत. :-

१. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, दिनांक ३१.१२.२०२० रोजी उप जिल्हाधिकारी संवर्गाची प्रसिध्द केलेल्या अंतिम सेवा ज्येष्ठता सूची संदर्भात, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र. २३६/२०२१ (श्री. के. सुर्यकृष्णमुर्ती विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) व मूळ अर्ज २३७/२०२१ (श्री. अजिंक्य पडवळ विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर), शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, दिनांक २३.०९.२०२४ रोजी उप जिल्हाधिकारी संवर्गाची प्रसिध्द केलेल्या अंतिम सेवा ज्येष्ठता सूची संदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र. १५२२/२०२४ (श्री. के. सुर्यकृष्णमुर्ती विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर), शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, दिनांक ०३.०१.२०२५ रोजी उप जिल्हाधिकारी संवर्गाची प्रसिध्द केलेल्या अंतिम सेवा ज्येष्ठता सूची संदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र. २३२/२०२५ (श्रीमती ज्योती लाटे-कदम व अन्य अनुषंगिक याचिकांमध्ये होणा-या अंतिम न्यायनिर्णयांच्या अधीन राहील.

२. अपर जिल्हाधिकारी या संवर्गात पदोन्नत झालेल्या उक्त अधिकारी यांनी त्यांच्या पदस्थापनेच्या पदावर रुजू होऊन कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांना अपर जिल्हाधिकारी (वेतनश्रेणी एस-२५ रु. ७८,८००-२,०९,२००/-) या संवर्गाच्या वेतनाचे लाभ अनुज्ञेय ठरतील.

३. सदर पदोन्नतीचे आदेश निर्गमित झाल्यापासून संबंधित अधिकारी पदोन्नतीच्या पदावर रुजू होईपर्यत त्यांना शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची रजा मंजुर करण्यात येऊ नये.

४. उपरोक्त पदोन्नत अधिकाऱ्यांनी शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१, दिनांक २१.०६.२०२१ मधील २ (१) (ड) (१) मधील तरतुदीनुसार पदोन्नतीने नियुक्तीचे आदेश निर्गमित झाल्यानंतर पदोन्नतीच्या पदावर रुजू होणे आवश्यक आहे, अन्यथा ते सेवा ज्येष्ठता गमावण्यास पात्र राहतील.

५. सदरहू आदेशांनुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून पदस्थापनेत बदल करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक ) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लघंन करणारी असल्यामूळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. संबंधित अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, नवीन नियुक्तीच्या जागी हजर झाल्याबाबतचा रुजू अहवाल e१.revenue@maharashtra.gov.in या ई-मेलव्दारे/टपालाव्दारे शासनास त्वरीत कळवावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४१३१६४५०८१९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.04.13 16:45:56 +05'30'

**(महेश वरुडकर)**
**शासनाचे उप सचिव**

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
५) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ३२.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
७) मा. अपर मुख्य सचिव, (महसुल), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८) मा.अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.
९) मा. अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
१०) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
११) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
१२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर.
१३) जिल्हा कोषागार अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
१४) संबंधित अधिकारी (विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत)
१५) महसूल व वन विभाग कार्यासन आस्था- ०१, आस्था- ०४ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१६) निवडनस्ती-कार्यासन आस्था-०१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.